ePaper

**अजित पवार मुख्यमंत्री कधी होणार?; प्रफुल्ल पटेल यांचा दावा**



| वर्ष - 7 | अंक - 87 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- अल-हिलालचा प्रस्ताव धुडकावला!
- सनी देओल रडला
- भाजप सत्तेसाठी देशही जाळू शकते
- शरद पवारांचा तिसरा प्लॅन

www.mahaenews.com | शुक्रवार , दिनांक 28 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# परिवारवाद नव्हे...मेरिटच!

## » शंकर जगताप यांच्या कामाची दखल घेऊन भाजपाकडून शहराध्यक्ष पदाची धुरा

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

**चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या आजारपणात विधानसभेची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेऊन पक्षाचा झेंडा अभेद्य ठेवण्याचे काम त्यांचे बंधू शंकर जगताप यांनी केले. आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर लागू झालेल्या पोटनिवडणूकीत देखील संकटमोचक बनून आमदार अश्विनी जगताप यांच्या विजयात मोलाचा वाटा उचलला . या कामगिरीची दखल पक्षीय पातळीवरून घेत शहराध्यक्ष पदाची धुरा त्यांच्या खांद्यावर दिली. संकटकाळात चिंचवड विधानसभेचा बालेकिल्ला राखण्यासाठी त्यांनी केलेल्या मेहनतीचे हे फळ असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शंकर जगताप यांना मिळालेले पद हा परिवारवाद नसून मेरिटवरच दिले असल्याचे भाजपाने स्पष्ट केले आहे.**



चिंचवड विधानसभेतील जनतेने दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना कायमच साथ दिली आहे. जगतापांचा या मतदारसंघात मोठा राजकीय कंट्रोल होता. भाजपा शहराध्यक्ष पदावर निवड केल्यानंतर त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेतील राष्ट्रवादीची तब्बल 25 वर्षांच्या सत्तेला आमदार महेश लांडगे यांच्या साथीने सुरूंग लावला होता. दरम्यानच्या काळात आमदार लक्ष्मण जगताप यांच्या आजारपणात चिंचवडचा बालेकिल्ला ढासळण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. अनेकांना आमदारकीची स्वप्ने पडली होती. मात्र दिवंगत आमदार जगताप यांच्या आजारपणात पहाडी भिंत बनून भाजपाचा बालेकिल्ला शाबूत ठेवण्याची काम शंकर जगताप यांनी केले. नागरिकांच्या अडचणी सोडविणे, मतदारसंघातील प्रश्न मार्गी लावणे, मतदारसंघात भेटी गाठी वाढविणे ही सर्व कामे शंकर जगतापांनी चालूच ठेवली. त्याचा परिणाम म्हणून चिंचवड पोटनिवडणूकीत भाजपाने आपल्या विजयाची पताका कायम राखली. भाजपकडून निष्ठावान, घराणेशाही नसलेल्यांनाच पदावर काम करण्याची संधी दिली जाते. शंकर जगताप यांच्या पाठिशी राजकीय वारसा असला तरी त्यांनी पोटनिवडणूकीत आणि दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पक्षात पक्षाला दिलेल्या उभारणीची दखल घेऊन मेरिटच्या आधारावरच त्यांना पद दिले असल्याचे शिक्कामोर्तब केले आहे.

### तिकिट नाकारूनही पक्षाशी प्रामाणिक

» चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीत शंकर जगताप यांनाच भाजपाचे तिकिट मिळेल अशी शक्यता होती. ऐनवेळी भावनिक लाट पाहून पक्षश्रेष्ठीकडून आमदार अश्विनी जगताप यांना उमेदवारी दिली. मात्र तरीही नाराज न होता पक्षाने दिलेली जबाबदारी शंकर जगताप यांनी पद्धतीने पार पाडली. अश्विनी जगताप यांना मोठ्या मताधिक्क्याने निवडून आणण्यात ते अग्रभागी राहिले.

### शंकर जगतापांनी बांधली जुन्या नव्यांची मोट

» शहराध्यक्षपदाची धुरा आल्यानंतर पक्षातील जुने कार्यकर्ते नाराज झाल्याची चर्चा भाजपांतर्गत पसरली होती. मात्र शंकर जगताप यांनी शहरातील सर्व माजी शहराध्यक्ष, त्यांचे कुटुंबीय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी, भाजपाचे निष्ठावान पदाधिकारी यांच्या भेटीगाठी घेतल्या. जुन्या नव्यांची मोट बांधून त्यांची नाराजी दुर करण्याचा अभिनव उपक्रम प्रत्यक्ष भेट घेऊन केला.

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ऑनलाईन अर्जासाठी मुदवाढ द्या!

## » राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजनेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासाठीची मुदत उद्या (२८ जुलै) रोजी संपुष्टात येत आहे. सर्वसामान्य नागरिकांना अर्ज सादर करताना द्यावयाच्या कागदपत्रांसाठी अनेक अडचणी येत असल्यामुळे या योजनेंतर्गत अर्ज सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे.**

याबाबत गव्हाणे यांनी आयुक्तांना लेखी निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आकुर्डी आणि पिंपरी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 938 घरांचा प्रकल्प राबविला आहे. या योजनेत घर घेण्यासाठी इच्छुक असलेल्या नागरिकांना अर्ज करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी 28 जून ते 28 जुलै असा तीस दिवसांचा कालावधी दिला होता. अर्जासाठी विविध प्रकारच्या दहा कागदपत्रांची पुर्तता करण्याचे बंधन अर्जदारास टाकण्यात आले आहे. महापालिकेने मागितलेली विविध दहा प्रकारच्या कागदपत्रांमध्ये



उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नोंदणीकृत भाडे करारनामा, अधिवास प्रमाणपत्रांसह इतर कागदपत्रांचा समावेश आहे. या कागदपत्रांची पुर्तता कारण्यासाठी इच्छुकांना मोठा कालावधी लागत आहे. वेळेत कागदपत्र उपलब्ध होत नसल्याने अनेक इच्छुक अर्ज करण्यापासून वंचित राहू शकतात. शहरातील नागरिकांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्याने इच्छुक नागरिकांना अर्ज करण्यासाठी आणखी तीस दिवसांचा कालावधी वाढवून देण्यात यावा, अशी मागणी गव्हाणे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# पुन्हा दरड कोसळली

## मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर पुन्हा एकदा दरड कोसळल्याची घटना घडली आहे. एक्सप्रेस वेवरील कामशेत बोगद्याच्या तोंडाजवळ मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर मोठी दरड कोसळल्याने पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली आहे.**



सदर घटना ही गुरूवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास घडली. दरड कोसळल्याची माहिती मिळताच आयआरबीचे कर्मचारी व देवदूत आपत्कालीन पथक आणि खंडाळा व वडगाव महामार्ग पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

### माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी

कोकणात पावसामुळे हाहाकार उडाला आहे. जोरदार पावसामुळे रायगडमधील खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी गावावर डोंगराचा काही भाग कोसळून अनेक कुटुंब ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. बुधवारी रात्री 10.30 च्या सुमारास ही घटना घडली. ढिगाऱ्याखालून 103 जणांना बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. तर, आतापर्यंत 16 जणांचे मृतदेही बाहेर काढण्यात आले आहेत.

आयआरबी व देवदूत आपत्कालीन पथक युध्दपातळीवर मार्गावर पडलेली दगड, मातीचे ढिगारे हटविण्याचा प्रयत्न करत आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत आहे. यात मुंबई आणि पुण्याचा देखील समावेश आहे.

पुणे जिल्ह्यातील लोणावळा भागात पावसाचा जोर आहे. या हंगामात मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर दरड कोसळण्याची ही पहिली घटना नाही. याआधी 24 जुलै रोजी खंडाळा घाटात आडोशी बोगद्यावजळ दरड कोसळली होती. तेव्हा वाहतूक विस्कळीत झाली होती.

# तिसरा दहशतवादी अटक

## आरोपींवर कोथरुड ठाण्यात गुन्हा दाखल

। चाकण । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दहशतवाद विरोधी पथक सध्या पुण्यात पकडण्यात आलेल्या दोन दहशतवाद्याकडे कसून चौकशी करत आहे. त्यांच्या चौकशी दरम्यान, तिसरा दहशतवादी कास्तिल दस्तगीर पठाण ऊर्फ अब्दुल कादिर याचे नाव निष्पन्न झाले होते. त्यांना पुण्यात आश्रय दिल्याप्रकरणी एटीएसने संबंधित आरोपीला अटक केले आहे.**



### आरोपींची पोलिस कोठडीत चौकशी

अटक आरोपींची पोलिस कोठडीत चौकशी केल्यानंतर, त्यात त्यांना आश्रय देण्यासाठी मदत करणाऱ्या आरोपीचे नाव निष्पन्न झाले त्यानुसार सखोल विचारपूस करुन सदर आरोपीला देखील अटक करण्यात आले आहे. संबंधत आरोपींचा फरार झालेला साथीदार याचा तसेच गुन्हयातील अटक आरोपींनी फरार कालावधीत सहाय्य करणारे इसमांचा व गुन्हयाचा अधिक तपास एटीएसची विविध पथके करत आहे.

यापूर्वी याप्रकरणी मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान (वय-23,रा.कोंढवा,पुणे) व मोहम्मद युनुस याकुब साकी (वय-24,रा. कोंढवा,पुणे, दोघे मु.रा.रतलाम, मध्यप्रदेश) यांना अटक करण्यात आलेली आहे. त्यांचा एक साथीदार पळून गेलेला आहे. याप्रकरणी आरोपींवर कोथरुड पोलिस ठाण्यात सुरुवातीला वाहनचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु पोलिस चौकशीत संबंधित आरोपी दहशतवादी असल्याचे आणि देशविघातक घातपात करण्याचे त्यांचे कट उघडकीस आले. त्यानंतर याबाबतचा तपास एटीएसकडे वर्ग करण्यात आला. संबंधित दोन आरोपींवर एनआएकडून राजस्थानमधील चितोढगढ येथे गुन्हा दाखल असून त्या गुन्हयता ते फरार होते. त्यांच्यावर प्रत्येकी पाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. आरोपींकडे केलेल्या तपासात व आरोपींनी दिलेल्या माहितीवरुन कोंढवा येथील चेतना गार्डन सोसायटीतील एका घरातून लॅपटॉप, टॅब, वजनकाटा, ड्रोन, नकाशा, बॅटरीसेल, इलेक्ट्रानिक सर्किट, सोल्डरिंग गन, काळया रंगाची चकचकीत केमीकल पावडर व वेगवेगळी उर्दु व अरेबिक भाषेतील पुस्तके असे साहित्य जप्त करण्यात आले आहे. आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेली चकचकीत पावडरची तज्ञांनी तपासणी केली असता, सदर पावडर ही स्फोटक पदार्थ असल्याचा प्राथमिक अहवाल दिला गेला आहे. तसेच आरोपींनी जंगल परिसरात रहाण्यासाठी,वापरासाठी घेतेले टेन्ट जप्त करण्यात आले आहे. आरोपींकडून जप्त करण्यात आलेले साहित्य तपासणी होवून अहवाल मिळणेसाठी फॉरेन्सिक लॅबला पाठविण्यात आले आहे.

# बांगलादेशी घुसखोरांवर तातडीने कारवाई करा

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

पुणे शहरात गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक वास्तव्य करत असल्याची धक्कादायक माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे, पुणे पोलिसांनी गेल्या आठवड्यात कोथरूड येथून दोन दहशतवादी पकडले आहेत.

ह्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी पुणे शहराच्या वतीने गुरवारी पुणे पोलिस आयुक्त रितेश कुमार यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात गेल्या काही दिवसात पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी घुसखोर अवैध रित्या पुण्यात वास्तव्यास असल्याचे पुणे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

हे घुसखोर पुणे शहराच्या विविध भागात वास्तव्य करत असल्याने पुणे पोलिसांनी तातडीने या बाबत कारवाई करून त्यांची पूर्ण माहिती घ्यावी तसेच बेकायदेशीर रित्या पुण्यात राहत असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करावी अशी मागणी शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी केली आहे.

पुढील काही दिवसात मोठ्या प्रमाणावर सणवार सुरू होत असल्याने शहराच्या सुरक्षितते च्या दृष्टीने ही माहिती खूप धक्कादायक आहे त्यामुळे ह्या बाबत तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली या प्रसंगी शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या समवेत प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर,माजी आमदार योगेश टिळेकर , माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले,माजी नगरसेवक सुशील मेंगडे, दीपक पोटे, अजय खेडेकर ,राजेंद्र शिळीमकर धनराज घोगरे बापू मानकर विकास लवटे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडकरांची 'भूमी अभिलेख' साठी थांबणार पायपीट!

## 'ती' गावे पिंपरी-चिंचवड कार्यालयाशी जोडण्यास राज्य सरकार सकारात्मक

### महसूलमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील व आ. महेश लांडगे यांच्यात सविस्तर चर्चा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भूमी अभिलेख कार्यालयातील कामांसाठी पिंपरी चिंचवडकरांची ' हवेली कार्यालयात होणारी पायपीट थांबणार आहे. महापालिका हद्दीतील गावांचा समावेश आता हवेली कार्यालयाऐवजी पिंपरी-चिंचवड भूमी अभिलेख कार्यालयांतर्गत होण्याच्या हालचाली सुरू आहेत. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी नुकतीच त्या बाबत सकारात्मकता दर्शवली आहे.**

भाजपा शिरूर लोकसभा निवडणूक प्रमूख तथा आमदार महेश लांडगे यांनी या बाबत पाठपुरावा सुरू केला असून त्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्याची सुचना मंत्री विखे-पाटील यांनी संबंधित विभागाला दिल्या आहेत. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई मंत्रालय येथे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची आमदार महेश लांडगे यांनी भेट घेतली. यावेळी भूमी अभिलेखच्या मागण्यांबाबत आमदार लांडगे यांनी निवेदन दिले.

भूमी अभिलेख कार्यालयातून शेत जमिनीची मोजणी, जमिनीचे नकाशे, भू-संपादनाची मोजणी, न्यायालयातून आलेल्या प्रकरणाचे निर्गतीकरण करणे, न्यायालयाच्या आदेशानुसार जमिनीच्या मोजणी, खरेदी विक्री, वारसा वाटणी नोंदी आदींसह त्या संदर्भातील दाखले, नमुने देण्याचे काम केले जाते.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील काही गावांचा समावेश हवेली भूमी अभिलेख कार्यालयांतर्गत येत होता. त्यामुळे नागरिकांना पुणे येथील कार्यालयात आपल्या कामांसाठी जावे लागते. या ठिकाणी काम न झाल्यास पुन्हा जावे लागत होते. यामुळे वेळ व पैसा खर्च होत होता. मात्र आता नागरिकांची ही गैरसोय टळणार आहे. पूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील काही गावांचा हवेली तहसील कार्यालय अंतर्गत समावेश होता. मागील काही कालावधीमध्ये सदर गावे पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाअंतर्गत संलग्नीत करण्यात आलेली आहेत. त्यामुळे तहसीलशी संबंधीत कामांची होणारी नागरिकांची गैरसोय टळली आहे. त्याच धर्तीवर भूमी अभिलेख हवेली कार्यालयातील काही गावे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत आहेत. ही गावे भूमी अभिलेख कार्यालय पिंपरी- चिंचवड या कार्यालयाशी संलग्नीत करण्याची मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली. त्यामुळे नागरिकांना जमीन मोजणीकरिता तसेच प्रॉपर्टी कार्डच्या या कामासाठी हवेली भूमी अभिलेख कार्यालयामध्ये जाण्याची भौगोलिक दृष्ट्या गैरसोय टळेल, अशी भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली.याबाबत मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून त्या बाबतचा प्रस्ताव त्वरीत सादर करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत.

तसेच बोपखेल, दिघी, वडमुखवाडी, च-होली, चोवीसावाडी, डुडूळगाव, मोशी, चिखली, देहू, किन्हई, रावेत, मामुर्डी, किवळे आदी गावे नगर भूमापन अभिलेख पिंपरी-चिंचवड कार्यालयाशी संलग्नीत करावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली.



> पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे 30 लाखाच्या घरात आहे. पूर्वी हवेली भूमी अभिलेख कार्यालयाचे क्षेत्र लोकसंख्या कमी असल्याने सोयीचे होते. मात्र आता पिंपरी चिंचवड मधील नागरिकांना भूमी अभिलेख संदर्भातील कामांसाठी पुण्यात जावे लागते. ही गैरसोय टाळण्यासाठी महसूलमंत्र्यांकडे पिंपरी-चिंचवडशी संबंधित गावे जोडण्याची मागणी केली. लवकरच या बाबत सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> – **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा तथा निवडणूक प्रमुख, शिरूर लोकसभा भाजपा.

# सराईत गुन्हेगार रिंकू चौहाण टोळीवर 'मोक्का'

## 21 संघटित टोळ्यांवर, 209 अट्टल गुन्हेगारांवर कारवाई

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरात संघटीत गुन्हे करणाऱ्या अमर उर्फ रिंकू कुलवंतसिंग चौहाण याच्यासह त्याच्या इतर ४ साथीदारांवर पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी मोक्का कारवाई केली आहे. पोलिस आयुक्तांनी आतापर्यंत तब्बल २१ संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर मोक्का कायद्यान्वये कारवाई करुन २०९ अट्टल गुन्हेगारांवर मोक्का कारवाई केली आहे.**

टोळी प्रमुख अमर उर्फ रिंकू कुलवंतसिंग चौहाण (वय-33 रा. नेहरुनगर पिंपरी) टोळी सदस्य रोहित प्रविण धनवे (वय-20 रा. महेशनगर पिंपरी), अक्षय आण्णा रणदिवे (वय-29 रा. खंडे वस्ती, भोसरी), साहिल सुधीर धनवे (वय-20 रा. प्रगती शाळेजळ, महेशनगर, पिंपरी), सोन्या रणदिवे (रा. नेहरुनगर, पिंपरी) यांच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. टोळी प्रमुख अमर उर्फ रिंकू चौहाण याने साथीदारांसह तसेच काही नवीन साथीदारांना सोबत घेऊन टोळी तयार करुन आर्थिक फायद्यासाठी तसेच टोळीच्या वर्चस्व व दहशत पसरवण्यासाठी गुन्हे केले आहेत. रिंकू चौहाण याने पिंपरी, बंडगार्डन, निगडी, भोसरी, येरवडा, विश्रांतवाडी, समर्थ, सहकारनगर, एमआयडीसी भोसरी, विमानतळ, चिंचवड, चंदननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत खुनाचा प्रयत्न, कट रचणे, पुरावा नष्ट करणे, अपहरण, दरोड्याची तयारी, जबरी चोरी, खंडणी, दुखापत करणे, वाहनांची तोडफोड करणे, विनापरवाना शस्त्र बाळगणे असे गंभीर गुन्हे केले आहेत. या टोळीने 38 एकत्र गुन्हे केले असून स्वतंत्रपणे 12 गंभीर गुन्ह्यांसह 32 गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपींवर पिंपरी पोलीस ठाण्यात आयपीसी 397, 394, 384, 323 504, 506, 143, 147, 149, आर्म अॅक्ट, महाराष्ट्र पोलीस अॅक्ट, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अॅक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे.

या गुन्ह्यात मोक्का गुन्ह्याचा अंतर्भाव करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम राजमाने यांनी पोलीस आयुक्त परिमंडळ 1 विवेक पाटील यांच्या मार्फत अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांच्याकडे सादर केला. या अर्जाची छाननी करुन अपर पोलीस आयुक्तांनी मोक्का गुन्ह्याचा अंतर्भाव करण्यास मान्यता दिली. पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त सतीश कसबे करीत आहेत.




### पोलीस पथकाची कामगिरी...

» ही कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त गुन्हे स्वप्ना गोरे, पोलीस उपायुक्त परिमंडळ 1 विवेक पाटील, सहायक पोलीस आयुक्त सतिश कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली पी.सी.बी. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम राजमाने, पोलीस अंमलदार सचिन चव्हाण, व्यंकप्पा कारभारी, पी.सी.बी. गुन्हे शाखा सहायक पोलीस फौजदार अनिल गायकवाड, ओंकार बंड, दत्ताजी कौठेकर यांच्या पथकाने केली.



## भूमिका

**मणिपूरमधे जे घडतंय, त्याबद्दल आपल्या समाजात आजही पुरेशी संवेदनशीलता दिसत नाही. समाजात ज्या प्रकारे जाणीवपूर्वक दुहीचे, विद्वेषाचे विष पेरले जात आहे, ते पाहता एक दिवस हा मणिपूरच्या आगीचा डोंब आपल्या गल्ल्यांच्या बोळांतून आपल्या घरापर्यंत येऊ शकेल. आपण निष्क्रियच राहिलो तर तो दिवस दूर नाही. म्हणून आपण बोलले पाहिजे, झाल्या प्रकाराचा शक्य त्या माध्यमांतून निषेध केला पाहिजे.**

# बोलायला कोणीच उरणार नाही!




४ मे २०२३ रोजी मणिपूरमधील मैतेई आणि कुकी या दोन समुदायांमधील हिंसाचारामध्ये दोन महिलांना विवस्त्र करून त्यांची रस्त्यावरून नग्न धिंड काढण्यात आल्याचा व्हिडिओ नुकताच सोशल मीडियावरून व्हायरल झाला. व्हिडिओमध्ये दोन कुकी स्त्रियांच्या शरीराला घाणेरडे स्पर्श करत, दाबत त्यांच्या आत्मसन्मानाच्या चिंधड्या उडवत एक मोठा जनसमुदाय त्यांना घेऊन जात होता.

त्या ओरडत आहेत, रडत आहेत, विव्हळत आहेत, पण त्या जमावाला काहीही फरक पडत नाही. जनावरांनाही लाजवेल अशा प्रकारचे निंद्य आणि गलिच्छ कृत्य त्यांच्यासोबत केले गेले. गेल्या दोन महिन्यांमध्ये मणिपूरमध्ये अमानुष अत्याचाराच्या अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. त्या आता हळूहळू समोर येत आहेत. जो व्हिडिओ सोशल मीडियावरती व्हायरल झाला, तो एक स्त्री म्हणून अंगाचा थरकाप उडविणारा होता. आपल्या इच्छेविरुद्ध किंवा नकळतपणेदेखील आपल्याकडे कुणी पाहात असेल, आपल्याला स्पर्श करण्याचा प्रयत्न करत असेल तर अपमानास्पद वाटते, हे कृत्य करणाऱ्या व्यक्तीची घृणा वाटते, आपल्या तळपायाची आग मस्तकाला जाते हा आपला प्रत्येकीचा अनुभव असतो. मग या कुकी समाजातील स्त्रियांच्या वाट्याला जिवंतपणी ज्या मरणयातना अनुभवास आल्या, त्या वेळी त्यांना काय वाटले असेल?कुठेही दंगली घडल्या की, त्यांची परिसीमा गाठली जाते ती स्त्रियांच्यावरील अत्याचारांतून. स्त्रीला शिवीगाळ करायची, अश्लीलपणे बोलायचे, तिला मारहाण करायची, तिच्यावर बलात्कार करायचे आणि एकट्याने अथवा सामूहिकरीत्या जसं जमेल तशी तिची विटंबना करायची.

एका समूहाला दुसऱ्या समूहासमोर आपली दहशत बसवून मर्दुमकी दाखवायची असेल तर त्यांच्यातल्या स्त्रिया विटंबित करायच्या, हा रानटी मार्ग अवलंबला जातो. क्रूरता इतकी डोक्यात भिनते की, तिथे पशूंनाही लाज वाटावी! ही घटना ४ मे रोजी घडली असं सांगितलं जातं आणि इंटरनेटची सुविधा बंद असल्यामुळे ती २० जुलै रोजी समाजमाध्यमांसमोर येते. त्याच्यावर सर्वोच्च न्यायालय सरकारला खडसावते आणि मग आपल्या देशाचे प्रधान सेवक काही सेकंद त्याच्यावर बोलतात. हे सगळं होत असताना पोलीस यंत्रणा काय करत होती? त्या राज्याचे मुख्यमंत्री काय करत होते? घटनेत सहभागी असणाऱ्या हजारो पुरुषांमधल्या एकालाही असं वाटलं नाही का की हे चुकीचे आहे? हे घडता कामा नये? यांसारखे अनेक प्रश्न मनात थैमान घालतात. आपल्याकडे नेहमी तालिबानी, इसिस यांच्या दहशतवादाची उदाहरणे दिली जातात. काही न घडलेल्या कथा 'टू स्टोरी' म्हणून दाखवत, त्यांच्यावर सिनेमे बनवले जातात. त्यांना पाहणारा एक वर्ग तयार झालेला आहे. असा वर्ग मणिपूरमध्ये घडलेल्या हिंसेवर साधं बोलायलाही कसा तयार नाही याचे आश्चर्य वाटते. या गोष्टी समाजमाध्यमांवर वाचतो, ऐकतो, दुःखद उसासे टाकतो आणि विषय सोडून देतो. असे का घडते? आपल्यातले माणूसपण संपले आहे का? माझ्यासह अनेकांचा असा अनुभव आहे की, या घडल्या प्रकाराबद्दल अनेक ग्रुप्सवर हे मेसेस फॉरवर्ड केले, त्यावर काही चळवळींचे ग्रुप वगळता इतर कुठल्याही ग्रुपवर एकालाही आपला निषेध नोंदवावासा वाटला नाही. याची कारणे काय असावीत? की स्त्रिया या अन्याय, अत्याचार सहन करण्यासाठीच जन्माला आलेल्या असतात, रोज कुठे ना कुठेतरी त्यांच्यावर हिंसा होतच असते, ती आज उघडकीला आली, म्हणून त्याच्यावर काय बोलायचे? अशी तरी आपली मानसिकता बनली नाही ना? समाजात घडणाऱ्या चुकीच्या कृत्यांबद्दल आपण कसलाही निषेध नोंदवायचा नाही, जे चालले आहे ते निमूट बघत राहायचे? गप्प का राहायचे? तर ज्यांची अब्रू लुटली, ज्यांची विटंबना केली, ज्यांचं माणूसपण हिरावून घेतलं गेलं; त्या तुमच्या कुणीच नाहीत. त्या तुमच्या समाजातल्या नाहीत, तुमच्या जातीतल्या नाहीत, तुमच्या मुली नाहीत, तुमच्या बहिणी नाहीत, तुम्ही स्वतः स्त्री असाल तर त्या तुम्ही नाही.

## संपादकीय »

# भाष्य : स्वागत परदेशी विद्यापीठांचे

***आर्थिक उदारीकरण स्वीकारल्यानंतर लगेचच शिक्षण क्षेत्रातही व्यापक सुधारणा घडवायला हव्या होत्या. हे क्षेत्र त्याचवेळी खुले, स्वायत्त, स्पर्धात्मक, पारदर्शक केले असते तर आज तीन दशकांनंतर शिक्षणविषयक चित्र वेगळे दिसले असते...***

विद्यापीठ अनुदान आयोगाने परदेशी विद्यापीठांना भारतात येण्यास प्रवेशद्वार खुले केल्यानंतर आता उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. वस्तुतः हे १९९१मध्येच व्हायला हवे होते. त्यावेळी अर्थ, व्यापार, उद्योग क्षेत्रात 'उदारीकरण-खासगीकरण- जागतिकीकरणाचे' नवे पर्व भारतात सुरू झाले, ज्याचे श्रेय तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि तेव्हाचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांना जाते. लाल फीत आणि नोकरशाही हटवून ते खुले, स्वायत्त, स्पर्धात्मक, पारदर्शक केले असते तर आज तीन दशकांनंतर शिक्षणविषयक चित्र नक्कीच वेगळे दिसले असते. 'शांघाय रँकिंग्स २०२२'नुसार जगातील उत्कृष्ट पहिल्या ५०० विद्यापीठांच्या क्रमवारीत अमेरिकेची १२७, चीनची ८३ तर भारताचे फक्त एकच विद्यापीठ आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (२७ जुलै) राजस्थानमधील सिकोर येथून देशभरातील एक लाख २५ हजार प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्राचे लोकार्पण करणार आहेत. त्यानिमित्त. भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना या 'अमृत काळात' चहूबाजूंनी देश विकासाचा समृद्धपथ पादाक्रांत करत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला देशातील शेतकरीसुद्धा या विकासयात्रेचा साक्षीदार असायला हवा,**

# 'प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र



तो मुख्य प्रवाहात येऊन प्रवाही व्हायला हवा. सुजलाम, सुफलामतेच्या दिशेने शेतकऱ्यांनी प्रवास करावा याकरिता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या कर्तव्याशी प्रतिपद्धता जोपासत त्यांच्याकरिता कृषी क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध करून देत आहेत. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांची शेतीसाहित्य, कृषी निविष्ठा, नवनवीन तंत्रज्ञानावर आधारित शेतीविषयक माहितीचे आदान-प्रदान, त्यांच्या मालाची सुरक्षितता, पाश्चात्य देशात विकसित होत असलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान, शेतकरी जागरुकता, मार्गदर्शन, दळवणवळणाच्या पुरेशा सोईसुविधा यासंदर्भात गैरसोय होऊ नये, त्यांच्या सगळ्या प्रश्नांचे एकाच ठिकाणी उत्तर मिळावे, त्यांना सोईसुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र' सुरू करण्यात आले आहे. या केंद्रातून शेतकऱ्यांना उपरोक्त सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यानुषंगाने २७ जुलै रोजी राजस्थानमधील सिकोर इथून देशभरात एक लाख २५ हजार 'पीएमकेएस' केंद्रांचा शुभारंभ होत आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्नांना बळ देण्याचा प्रयत्न पंतप्रधानांकडून होत आहे. मात्र आता या केंद्रांच्या माध्यमातून या सुविधा शेतकऱ्यांना एकाच छताखालून उपलब्ध करून देण्याचा ऐतिहासिक प्रयत्न केंद्र सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पहिल्यांदाच केला असून त्याची देशभरात प्रभावी अंमलबजावणी होत आहे. या सुविधा गावे, तालुका, जिल्हा या ठिकाणी असलेल्या कृषी निविष्ठांच्या केंद्रांवर मिळतीलच शिवाय गरजेप्रमाणे नवी कृषी समृद्धी केंद्रे स्थापन केली जाणार आहेत. त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सर्व सुविधा एकाच ठिकाणांहून पुरविल्या जातील. पीएमकेएस केंद्राच्या माध्यमातून विविध स्तरांवर शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावयाच्या सोई-सुविधा निश्चित करण्यात आल्या असून त्यामध्ये गाव पातळीवर आलेल्या साहित्याची योग्य त्या पद्धतीने देखरेख व्हावी याकरिता रॅक, बसण्याची व्यवस्था, डिजिटल व्यवहारासाठी मशीन, क्यूआर कोड, बार कोड स्कॅनर, मालाची उपलब्ध, सबसिडी, किंमत दाखविणारे डिजिटल फलक, पीक साहित्य तक्ता, माती सुपीकता नकाशा, शासकीय विभागांकडून प्राप्त संदेशाचे प्रदर्शन, गावपातळीवरील सुविधांव्यतिरिक्त, तालुका, ब्लॉकच्या ठिकाणी इंटरनेट सुविधा, स्मार्ट टीव्ही, शेतकऱ्यांकरिता मदत कक्ष, सामायिक सेवा केंद्र, माती परीक्षण, बियाणे चाचणी नमुना संकलन, शेतीची अवजारे, ड्रोन इत्यादी असतील.

## ।। अभंगवाणी ।।



क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट ।
साधिलें अवीट निजसुख ॥१॥

सांडी मांडी मागें केल्या भरोवरी ।
अधिक चि परी दुःखाचिया ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शरद पवारांचा तिसरा प्लॅन!

## »राष्ट्रवादी मधील बंडखोरीनंतर पवारांची मोठी खेळी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवार पुन्हा एकदा पक्षबांधणीसाठी मैदानात उतरलेत. त्यांनी पक्षाचे बंडखोर नेते व भाजपला अस्मान दाखवण्याची मोठी तयारी केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, त्यांनी यासंबंधी 3 प्लॅन तयार केले असून, त्याचा सर्वात मोठा फटका केंद्रातील सत्ताधारी भाजपला बसण्याची शक्यता आहे.**

अजित पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसचा एक मोठा गट शिंदे - फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाला. त्यात अजित पवार स्वतः उपमुख्यमंत्री झाले, तर छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे आदी बडे नेते कॅबिनेट मंत्री झाले. या घटनाक्रमामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकले झाली. त्यानंतर अजित पवारांच्या गटाने शरद पवारांना सोबत घेण्याचा प्रयत्न केला. पण पवारांनी त्यांच्यासोबत येण्यास ठाम नकार दिला.

आता पवार पुन्हा एकदा नव्या जोमाने पक्ष संघटना बांधणीसाठी मैदानात उतरलेत. त्यांनी यासंबंधी 3 प्लॅन तयार केलेत.



### पर्यायी नेतृत्व तयार करणार

» शरद पवार आपल्या दुसऱ्या प्लॅन अंतर्गत पर्यायी नेतृत्व निर्माण करण्यावर भर देणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्या आमदारांनी पक्षाशी बंडखोरी केली, त्यांच्या मतदार संघात ते पर्यायी नेतृत्व उभे करतील. यात पक्षाच्या माजी आमदारांना पुन्हा ताकद दिली जाईल. त्यांना रसद पुरवली जाईल. हे माजी आमदार निवडणुकीत उतरतील, याच हिशेबाने त्यांना तयार केले जाईल, असे सूत्रांनी सांगितले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकले झाल्यानंतर शरद पवार यांनी पक्षाला उभे करण्यासाठी 3 प्लॅन तयार केलेत. यातील पहिल्या प्लॅननुसार, शरद पवार पक्ष बांधणीवर जोर देणार आहेत.

त्यानुसार राज्यातील सर्वच महत्त्वाचे जिल्हे व तालुक्यांत त्यांच्या सभा होतील. या भागातील जनतेशी शरद पवार संवाद साधून त्यांना आपल्या गाठीशी बांधण्याचा प्रयत्न करतील.

राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या भागावर त्याचा विशेष लक्ष असेल. नेते गेले तरी कार्यकर्ते व जनता आपल्याबरोबर राहील याची खास काळजी शरद पवार घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शरद पवारांची तिसरी खेळी सत्ताधारी भाजपसाठी नुकसानकारक ठरण्याची शक्यता या आहे.

या तिसऱ्या प्लॅननुसार, शरद पवार भाजपच्या अडगळीत पडलेल्या माजी आमदारांना आपल्या गोटात वळवण्याचा प्रयत्न करतील. या आमदारांना राष्ट्रवादीत घेऊन त्यांना रसद पुरवली जाईल.

सूत्रांच्या माहितीनुसार, या आमदारांची राजकारणात पुन्हा सक्रीय होण्याची इच्छा आहे. पण भाजपने त्यांच्याकडे साफ दुर्लक्ष केले आहे. यामुळे त्यांचा नाईलाज झाला आहे. त्यामुळे पवारांचा त्यांच्यावर डोळा आहे. यात त्यांना यश आले तर ते भाजपसाठी चांगलेच जड जाईल.

---

# सावित्रीबाई : आरोपीला फाशी द्या

## »आजपर्यंत आरोपी का सापडत नाही : आव्हाड

। मुंबई । प्रतिनिधी। महाईन्यूज

**सोशल मीडिया तसेच संकेतस्थळावर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल आक्षेपार्ह लिखाण प्रसिद्ध झाल्याच्या मुद्द्यावरून आज विधानसभेत विरोधकांसोबतच सरकारनेही संताप व्यक्त केला. सावित्रीबाईंचा अपमान करणाऱ्यांना मुसक्या बांधून आणले पाहिजे, अशी आक्रमक भूमिका काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी मांडली.**



### सरकारची भूमिका संशयास्पद

» काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात विधानसभेत म्हणाले की, या प्रकरणी सरकारची भूमिका संशयास्पद आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावरती अत्यंत चुकीचे लिखाण करणारा अजूनही मोकाट आहे. सरकारने असे विकृत लिखाण करणाऱ्या गुन्हेगाराला मुसक्या बांधून आणले पाहिजे आणि रस्त्यावरून फिरवले पाहिजे, सरकार हे कधी करणार आहे? सरकारने अजून आरोपीचा शोध का घेतला नाही? हे अतिशय संतापजनक आहे.

त्यावर क्रांतीज्योती सावित्रीबाईंचा अपमान करणाऱ्याच्या मुसक्या बांधण्याचे तुम्ही बोलत आहात, पण आमचे मत आहे की अशा आरोपीला भररस्त्यात फाशी दिली पाहिजे, अशी भूमिका उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर अत्यंत आक्षेपार्ह लेख लिहिण्यात आले आणि काही अश्लील चित्रे टाकण्यात आले. यातून सावित्रीबाई या आमच्या आईला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. हा गुन्हा मेमध्ये घडला. आज जुलै महिना आहे. मोठ्या राजकारण्यांविषयी काही लिहिलं गेलं की, 24 तासात सायबर पोलीस सक्रीय होतात आणि ते लिहिणाऱ्याला आकाश-पाताळ एक करून घेऊन येतात. मग सावित्रीबाईंविषयी इतकं आक्षेपार्ह लिहिल्यानंतर आजपर्यंत आरोपी का सापडत नाही? असा सवाल आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. 'इंडिक टेल्स' आणि 'हिंदू पोस्ट' या संकेतस्थळांवर भारतीय स्त्री शिक्षणाच्या जनक आद्य समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी आक्षेपार्ह लिखाण करण्यात आले आहे. तसेच, हे लेख ट्विटरवर शेअरही करण्यात आले आहेत. सावित्रीबाई फुलेंच्या बदनामी बाबतचा हा विषय शासनाने गांभीर्याने घेवून आक्षेपार्ह लेख लिहिणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आज विधानसभेत विरोधकांनी केली. बाळासाहेब थोरात यांना उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्या वेबसाईटने हे शेअर केले त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. सावित्रीबाईंविरोधात लिखाण करण्याचा सरकारमार्फत निषेध करतो. भारद्वाज स्पिक हे ट्विटर हँडल आहे. त्याबाबत ट्विटर इंडियालाही पत्र पाठवले आहे. पोलिस त्यांच्या संपर्कात आहेत. कुठल्याही परिस्थितीत या व्यक्तीला अटक केली जाईल. अलीकडच्या काळात जे डिजिटल पेपर आहेत. त्यात हे प्रसिद्ध झालेत.

# रतन टाटा यांना उद्योगरत्न पुरस्कार

। मुंबई । प्रतिनिधी। महाईन्यूज

नामांकित उद्योगपती आणि टाटा समूहाचे सर्वेसर्वा रतन टाटा यांना महाराष्ट्राचा पहिला उद्योगरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. यासंबंधी राज्य सरकारने घोषणा केली आहे. महाराष्ट्र शासनाने या वर्षापासून 'उद्योगरत्न पुरस्कार' देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राचा पहिला मानाचा पुरस्कार रतन टाटा यांना जाहीर करण्यात आला आहे.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत याबाबत माहिती दिली. महाराष्ट्र भूषण दर्जाचा हा पुरस्कार देण्याचा निर्णय झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत बुधवारी बैठक झाली. या बैठकीत याबाबतचा निर्णय झाला.

उद्योगरत्न पुरस्कार यंदापासून देण्यात येणार आहे. हा राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार असेल. पहिला पुरस्कार टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष रतन टाटा यांना देण्यात येईल. याशिवाय महिला तसेच मराठी उदयोजक व अन्य एका उद्योजकाला असे तीन पुरसकार देण्यात येतील, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार साहित्य, कला, विज्ञान या क्षेत्रामध्ये अलौकिक कामगिरी करणाऱ्यांना प्रदान करण्यत येतो. याच धर्तीवर यंदापासून 'उद्योगरत्न पुरस्कार' देण्यात येणार आहे. टाटा ग्रुप भारतातील सर्वात जुना आणि सर्वात मोठ्या व्यावसायिक घराण्यांपैकी एक आहे.

देशाला पुढे नेण्यात रतन टाटा यांचा मोठा वाटा आहे. तसेच टाटा समूहाची मोठी भरभराट रतन टाटा यांनी आपल्या कारकिर्दीत करून दाखवली. आजही रतन टाटा हे टाटा समूहाचे मानद अध्यक्ष आहेत. रतन टाटा हे त्यांच्या साधेपणासाठीही प्रसिद्ध आहेत.

# भाजप सत्तेसाठी देशही जाळू शकते

## »मोदी मणिपूरवर बोलत नाहीत : राहुल गांधींचा हल्लाबोल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**संसदेत मणिपूरवर चर्चेसह पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या विषयावर बोलण्याच्या मागणीवरून विरोधक आक्रमक झालेले असताना काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे. ट्विटरवर व्हिडिओ शेअर करत त्यांनी मोदींवर निशाणा साधला आहे.**

व्हिडिओमध्ये राहुल म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरसाठी काय करत आहेत? तो मणिपूरबद्दल काहीच का बोलत नाही? कारण नरेंद्र मोदींचा मणिपूरशी काहीही संबंध नाही. त्यांच्या विचारसरणीने मणिपूर जाळले हे त्यांना माहीत आहे. भाजप-आरएसएसला फक्त सत्ता हवी आहे आणि सत्ता मिळवण्यासाठी ते काहीही करू शकतात, असे राहुल म्हणाले. सत्तेसाठी ते मणिपूर जाळतील, संपूर्ण देश जाळतील. त्यांना देशाच्या दुःखाची पर्वा नाही.



राहुल म्हणाले की, आरएसएस-भाजप आणि काँग्रेसमध्ये वैचारिक युद्ध सुरू आहे. तर काँग्रेसची विचारधारा संविधानाचे रक्षण करणे, देशाला संघटित करणे आणि सामाजिक विषमतेविरुद्ध लढणे आहे. दुसरीकडे काही निवडक लोकांनी हा देश चालवावा आणि देशाची सर्व संपत्ती त्यांच्या हातात असावी, अशी आरएसएस-भाजपची इच्छा आहे. माजी काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, 'भारत जोडो यात्रे'मध्ये एक नारा निघाला - द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उघडायचे आहे. त्यांनी (भाजप) द्वेष पसरवला तरी तुम्ही तिथे जाऊन प्रेमाचे दुकान उघडा. विरोधी आघाडीने एक नाव निवडले - इंडिया, एक नाव जे आमच्या हृदयातून बाहेर पडले. आम्ही हे नाव निवडताच नरेंद्र मोदी जी इंडियाला शिव्या देऊ लागले. मोदीजींना इतका अहंकार आहे की ते इंडिया या पवित्र शब्दाला शिवी देत आहे असेही त्यांना वाटले नाही. तुमच्या हृदयात देशभक्ती असेल तर, देशातील कोणत्याही नागरिकाला दुःख झाल्यास तुम्हालाही दुख होईल. मात्र भाजप-आरएसएसच्या लोकांना काहीच वेदना होत नाही, कारण ते भारताचे विभाजन करण्याचे काम करत आहेत, असे राहुल म्हणाले.

### इंडियाचे शिष्टमंडळ मणिपूरला जाणार

» लोकसभेतील काँग्रेसचे व्हिप मणिकम टागोर म्हणाले की, विरोधी पक्षांच्या 20 हून अधिक खासदारांचे एक शिष्टमंडळ या आठवड्यात मणिपूरला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेणार आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी नुकताच मणिपूरचा दौरा केला. तत्पूर्वी, मणिपूर हिंसाचाराच्या मुद्द्यावरून संसदेत सुरू असलेल्या गतिरोधादरम्यान काँग्रेसने बुधवारी लोकसभेत सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला होता. ज्यावर सभागृहात चर्चेसाठी मंजुरी देण्यात आली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला सर्व पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करून या प्रस्तावावर चर्चेची तारीख ठरवतील.

# सर्वेक्षणाचा निकाल राखीव

## »ज्ञानवापी: हायकोर्टात 3 ऑगस्टला निकाल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**ज्ञानवापीच्या एएसआय सर्वेक्षणप्रकरणी गुरुवारी उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. आता 3 ऑगस्टला निर्णय होणार आहे. मशीद व्यवस्था समितीने या सर्वेक्षणाला स्थगिती देण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मंदिर सीआयएसएफच्या संरक्षणाखाली असल्याचे सरकारकडून न्यायालयाला सांगण्यात आले. खटल्याचा निकाल देण्यास विलंब का होत आहे, असा सवाल न्यायालयात हिंदू पक्षाने विचारला. हिंदू पक्षाचे वकील विष्णू शंकर जैन यांनी न्यायालयीन कामकाजाची माहिती दिली..**



### सर्वेक्षण कसे होणार?

हे सर्वेक्षण कसे केले जाईल, हे न्यायालयाला जाणून घ्यायचे होते. यावर विष्णू शंकर जैन म्हणाले की, सर्वेक्षणाचे तंत्र वैज्ञानिक आहे. यामुळे संरचनेचे कोणतेही नुकसान होणार नाही. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल शशी प्रकाश सिंह यांनीही हे तंत्रज्ञान अत्यंत सुरक्षित आणि वैज्ञानिक असल्याचे न्यायालयाला सांगितले. संरचनेचे कोणतेही नुकसान होणार नाही. मात्र, त्यांच्या उत्तराने न्यायालयाचे समाधान झाले नाही.

दुसरीकडे, मुस्लिम पक्षाचे वकील, अधिवक्ता एसएफए नक्वी यांनी न्यायालयाला सांगितले की, 1947 पासून इमारतीची ही स्थिती आहे, ती बदलता येणार नाही. पूजास्थान कायद्याच्या कलम 3 मध्ये म्हटले आहे की, कोणतीही व्यक्ती प्रार्थनास्थळाचे स्वरूप बदलू शकत नाही. तत्पूर्वी बुधवारी उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. एएसआयच्या अतिरिक्त संचालकांनी प्रतिज्ञापत्र जारी केले. सर्वेक्षणामुळे इमारतीचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे सांगितले. तसेच कोणतेही बांधकाम हटवले जाणार नाही. यानंतर गुरुवारी सायंकाळी 5 वाजेपर्यंत सर्वेक्षणावरील बंदी वाढवण्यात आली. त्याचवेळी विष्णू शंकर जैन यांनी न्यायालयात सांगितले की, इमारतीच्या आत मंदिराचे अवशेष आहेत. याचे पुरावे आमच्याकडे आहेत. ASI तपास करून शोधू शकते. औरंगजेबाने मंदिर तोडले, बांधले नाही. मंदिराच्या भिंतीला मुस्लिमांनी मशिदीचे स्वरूप दिले. विष्णू शंकर जैन यांनी टॅबलेटवरील छायाचित्रे सरन्यायाधीशांना दाखवले. जैन म्हणाले, ज्ञानवापी संकुलात संस्कृत श्लोक, जुनी ज्योतिर्लिंगे, हिंदू कलाकृती इत्यादी आहेत. आमच्या अर्जासह वेस्टर्न वॉलचे चित्र आहे. आम्हाला बॅरिकेडिंग क्षेत्राचे सर्वेक्षण करायचे आहे. एएसआय सर्वेक्षण करण्याच्या वाराणसी जिल्हा न्यायाधीशांच्या आदेशाविरोधात मस्जिद समितीने अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. बुधवारी उच्च न्यायालयाने एएसआय सर्वेक्षण तंत्राबाबत सखोल चौकशी केली. न्यायालयात उपस्थित पुरातत्व विभागाचे अतिरिक्त महासंचालक आलोक त्रिपाठी यांनी सांगितले की, वैज्ञानिक सर्वेक्षणामुळे इमारतीला इजा होणार नाही. तसेच कोणतेही बांधकाम हटवले जाणार नाही आलोक यांनी सांगितले की, जीपीआर प्रणालीचा वापर भूमिगत तपासासाठी केला जाईल.

# खासदार काळे कपडे घालून संसदेत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

मणिपूर हिंसाचारावरून गुरुवारीही संसदेच्या दोन्ही सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे अवघ्या 6 मिनिटांनी सभापती ओम बिर्ला यांनी कामकाज दुपारी 2 वाजेपर्यंत तहकूब केले. घोषणाबाजीमुळे पुन्हा दुपारी 3 वाजेपर्यंत कामकाज तहकूब करण्यात आले. दुसरीकडे, राज्यसभेतही विरोधी पक्षाचे खासदार फलक घेऊन आले आणि पंतप्रधान सभागृहात या, सभागृहात या आणि काही बोला, पंतप्रधान मौन सोडा... अशा घोषणा देताना दिसले. हे पाहून एनडीएच्या खासदारांनी मोदी...मोदी...च्या घोषणा देण्यास सुरुवात केली, त्यानंतर विरोधकांनी इंडिया... इंडिया घोषणा दिल्या. घोषणाबाजीने राज्यसभेचे कामकाज आधी दुपारी 12 वाजेपर्यंत आणि नंतर 2 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. मणिपूर हिंसाचाराच्या निषेधार्थ विरोधी खासदार काळ्या पोशाखात आले. मात्र, उपाहारानंतर सदस्यांनी सभागृहातून सभात्याग केला. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी आम आदमी पक्षाचे निलंबित राज्यसभा सदस्य संजय सिंह यांना रात्रभर धरणे धरू नका, असा सल्ला दिला. त्याऐवजी त्यांनी दररोज संसदेचे कामकाज संपल्यानंतर निदर्शनेही संपवावीत.

पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, विरोधी आघाडी भारत राज्यसभेत होणाऱ्या व्यवसाय सल्लागार समितीच्या (बीएसी) बैठकीवर बहिष्कार घालू शकते. दरम्यान, INDIA आघाडीचे सर्व खासदार काळे कपडे घालून संसदेत पोहोचले आहेत. मणिपूर हिंसाचाराच्या मुद्द्यावर आपला निषेध व्यक्त करण्यासाठी विरोधी पक्षाच्या खासदारांनी हा निर्णय घेतला आहे. येथे, सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर काँग्रेसने गुरुवारी (27 जुलै) आपल्या राज्यसभा खासदारांना सभागृहात उपस्थित राहण्याचा व्हीप जारी केला. यामध्ये काँग्रेसच्या राज्यसभा खासदारांना दिवसभर सभागृहात उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे.

# 'कतरिना'मुळे माझं करिअर संपलं



बॉलीवूडचा भाईजानच सलमान खाननं २०१० मध्ये एका अभिनेत्रीला बॉलीवूडमध्ये ब्रेक दिला. सुरुवातीला तिला पाहून सगळ्यांनी ही तर कतरिनाची कॉपी आहे. असे म्हटले. सलमानची लाडकी अभिनेत्री म्हणूनही तिच्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. झरीन खान हे त्या अभिनेत्रीचे नाव. आता तिनं धक्कादायक खुलासा केला आहे. सलमानसोबत वीर या चित्रपटातून झरीन खाननं डेब्यू केलं होतं. त्यानंतर आणखी काही चित्रपटांमध्येही ती दिसली होती. केवळ कतरिना सारखी दिसते म्हणून झरीन खानला बॉलीवूडमध्ये चित्रपट मिळणे बंद झाले. असे तिनं काही मुलाखतींमधून स्पष्टपणे सांगितले. झरीननं थेटपणे कतरिनाचे नाव घेत तिच्यामुळे आपल्याला मोठी किंमत मोजावी लागल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर झरीन आणि कतरिना यांची नेहमीच तुलना होताना दिसते. झरीन आणि कतरिना या दोघीही दिसायला सारख्या म्हणून त्यांच्यात नेहमीच तुलना होत राहिली. यासगळ्यावर झरीननं काही धक्कादायक खुलासे केले आहे. आस्क मी एनिथिंग सेशनच्या दरम्यान तिनं चाहत्यांशी संवाद साधला आहे. त्यात तिनं आपण वीर, रेडी आणि हाऊसफुल २ सारख्या चित्रपटांमध्ये काम केल्याचे म्हटले आहे. तुम्ही मला माझ्या चित्रपटाशी संबंधित प्रश्न विचारु शकता असे चाहत्यांना म्हटल्यावर तिला जे प्रश्न विचारण्यात आले त्यावर झरीनला स्पष्टपणे बोलावेच लागले. झरीन म्हणाली, मी जेव्हा इंडस्ट्रीमध्ये आली तेव्हा एका अल्लड मुलीसारखी होते. माझे बॅकग्राउंड काही चित्रपटाशी संबंधित नव्हते. त्यामुळे की काय माझी तुलना कतरिनासोबत व्हायला लागली. मी तर तिची चाहती होते. पण तिचा मोठा परिणाम माझ्या करिअरवर झाला.

# दोनोंचा टीझर



राजश्री प्रॉडक्शनने जिओ सिनेमाच्या सहकार्याने आगामी 'दोनों' चित्रपटांचा टीझर रिलीज केला आहे. सनी देओलचा धाकटा मुलगा राजवीर देओल या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. त्याचवेळी त्याच्यासोबत नवोदित अभिनेत्री पालोमा दिसणार आहे. राजश्री प्रॉडक्शन हे कौटुंबिक प्रेमकथेसाठी ओळखले जाते, त्याचप्रमाणे हा चित्रपट दोन अज्ञात लोकांची नवीन पिढीची सुंदर प्रेमकथा असेल. राजश्री प्रॉडक्शनच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाऊंटवरून या चित्रपटाचा टीझर रिलीज करताना लिहिले आहे की, 'दोन अज्ञात लोकांच्या प्रेमाच्या निरागसतेमध्ये आपले स्वागत, ज्यांचे गंतव्यस्थान समान आहे. हा नवा प्रवास लवकरच चित्रपटगृहात दाखल होणार आहे. दिग्दर्शक अविनाश बडजात्या. स्टार कास्ट - राजवीर देओल आणि पालोमा धिल्लन. सनी देओलचा मुलगा राजवीर आणि पलोमा धिल्लन यांच्यासोबतच सूरज बडजात्याचा मुलगा अवनीशही या चित्रपटातून दिग्दर्शनात पदार्पण करत आहे. राजश्री प्रॉडक्शनचा शेवटचा रिलीज होता ऊंचाई, जो २०२२ मध्ये रिलीज झाला. याचे दिग्दर्शन सूरज बडजात्या यांनी केले होते. प्रॉडक्शन हाऊस 2024 मध्ये सलमान खान आणि क्रिती सेननसोबत प्रेम की शादी हा चित्रपट आणणार आहे.

राजवीर देओल सनी देओल आणि पूजा देओलचा धाकटा मुलगा आहे. राजवीरच्या आधी त्याचा मोठा भाऊ करण देओल यानेही पल पल दिल के पास या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे.

# सनी देओल रडला

सनी देओल आणि अमिषा पटेल यांचा मोस्ट अवेटेड चित्रपट गदर-2 चा ट्रेलर 26 जुलै रोजी रिलीज झाला आहे. काल रात्री मुंबईत या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च कार्यक्रम पार पडला. या इव्हेंटशी संबंधित एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे, ज्यामध्ये सनी इव्हेंटदरम्यान भावूक होताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये सनी आणि अमिषा स्टेजवर दिसत आहेत. ट्रेलर लॉन्चच्या वेळी सनी देओल ताराच्या गेटअपमध्ये तर अमिषा सकीनाच्या गेटअपमध्ये पोहोचली. अभिनेत्याने केशरी कुर्ता, पांढरा पठाणी सलवार कोट घातला आहे. यासोबतच त्याने मॅचिंग पगडीही घातली आहे. तर अमिषा लाल शरारा सूटमध्ये दिसली होती. या अवतारात ती खूपच सुंदर दिसत आहे. स्टेजवर पोहोचताच लोकांचे प्रेम पाहून सनीला अश्रू अनावर झाले. यावेळी अमिषा त्याचे अश्रू पुसताना दिसत आहे. सोशल मीडियावर चाहत्यांची या व्हिडिओला खूप पसंती मिळाली. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'सबसे प्यारी सकीना'. दुसऱ्या यूजरने लिहिले की, 'ब्लॉक बस्टर होगी मूवी'. तिसऱ्याने 'तारा सिंग इज बॅक' असे लिहिले.

# समंथासोबत माकडचेष्टा



समंथा रुथ प्रभु ही भारतातल्या लाखो तरुणांची क्रश आहे. समंथाचे नवीन सिनेमे कधी येतात याची चाहते आतुरतेने वाट पाहत असतात. समंथाने काही दिवसांपुर्वी जाहीर केलं की, मनोरंजन विश्वातुन ती काही काळ ब्रेक घेणार आहे. समंथा सध्या सुट्टीचा मनमुराद आनंद घेत आहे. समंथा सध्या इंडोनेशिया मधील बाली शहरात फिरायला गेलीय. तिथे समंथासमोर माकड आला आणि पुढे जी काय फजिती झाली ती जाणुन घ्या. बुधवारी, समंथा रुथ प्रभूने अनुषासोबत बालीमधील उलुवाटूला भेट दिली. दोघांनी या रोड ट्रिपचे अनेक फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये सामंथा ऑलिव्ह ग्रीन कलरच्या ड्रेसमध्ये दिसत आहे. तिच्या डोक्यावर टोपी आणि डोळ्यांवर काळा चष्मा आहे. समंथाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर आणखी काही फोटो आणि व्हिडिओ शेअर केले आहेत. बुधवारी, समंथा रुथ प्रभूने अनुषासोबत बालीमधील उलुवाटूला भेट दिली. दोघांनी या रोड ट्रिपचे अनेक फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये सामंथा ऑलिव्ह ग्रीन कलरच्या ड्रेसमध्ये दिसत आहे. तिच्या डोक्यावर टोपी आणि डोळ्यांवर काळा चष्मा आहे. समंथाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर आणखी काही फोटो आणि व्हिडिओ शेअर केले आहेत. समंथा लिहिते, 'मी याच ठिकणी शेवटी माझा चष्मा शेवटी पाहिला होता.' पुढच्या व्हिडिओत, चतुर माकड तिचा चष्मा धरताना दिसत आहे तर एक माणूस माकडाकडून चष्मा परत घेण्याचा प्रयत्न करतोय. मंथाने या क्लिपवर लिहिले आहे की, 'ठीक आहे... माकडाची निवड खरोखरच चांगली आहे.' एकुणच बालीला सुट्टीचा आनंद घेत असलेल्या समंथाला माकडांनी छळलेलं दिसतेय. सध्यातरी समंथाला तिच्या शरीरासाठी आणि आजारासाठी वेळ द्यायचा आहे.

# अल-हिलालचा प्रस्ताव धुडकावला!

## » फ्रेंच स्टार एमबाप्पेने नाकारली कोट्यावधींची ऑफर

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**फ्रेंच स्टार फुटबॉलपटू किलियन एमबाप्पेने सौदी अरेबियाच्या अल हिलाल क्लबकडून खेळण्याची ऑफर नाकारली आहे. पॅरिस सेंट-जर्मेन (PSG) कडून क्लब फुटबॉल खेळणाऱ्या एमबाप्पेने अल हिलालच्या प्रतिनिधींना भेटण्यास नकार दिला आहे. यामुळे सौदी क्लबच्या महत्त्वाकांक्षेला मोठा धक्का बसला आहे.**

अल हिलालने एमबाप्पेसमोर ३०० दशलक्ष युरो (सुमारे २७२५ कोटी रुपये) ची विक्रमी ऑफर ठेवली होती. मात्र, एमबाप्पेने अल-हिलालचा प्रस्ताव धुडकावत सौदी अरेबियाला खेळायला जाणार नाही, असे सांगितले.

फ्रेंच स्टारने या बुधवारी पॅरिसमध्ये असलेल्या अल-हिलाल क्लबच्या प्रतिनिधींशी कोणतीही चर्चा करण्यास नकार दिला, असे फ्रेंच वृत्तपत्र L'EQUIPE च्या अहवालात म्हटले आहे. झेनिट सेंट पीटर्सबर्ग येथून ब्राझिलियन खेळाडू माल्कमच्या हस्तांतरणास अंतिम रूप देण्यासाठी सौदी क्लबचे एक शिष्टमंडळ पॅरिसमध्ये आले.

फ्रेंच राजधानीत असताना शिष्टमंडळाला आपला प्रस्ताव एमबाप्पेला सादर करायचा होता. मात्र, त्याने या शिष्टमंडळास भेटण्यास नकार दिला. अहवालात असे म्हटले गेले आहे की, "२४ वर्षीय किलियन एमबाप्पे एजंटने सौदी क्लबच्या प्रतिनिधींशी कोणतीही चर्चा करण्यास नकार दिला. फ्रान्सचा कर्णधार एमबाप्पे यांनी कधीही सौदी अरेबियाला जाण्याचा पर्याय विचारात घेतला नाही. रियाधस्थित अल हिलालला पीएसजीने एमबाप्पेशी बोलणी सुरू करण्याची परवानगी दिली होती. एमबाप्पेला कधीही सौदी लीगमध्ये खेळायचे नव्हते हे पीएसजीला माहीत होते. असे असतानाही त्यांनी अल-हिलालला परवानगी दिली होती. यामागील कारण अजूनही स्पष्ट झालेले नाही. एमबाप्पे गेल्या महिन्यात म्हणाला होता की, "तो पीएसजी बरोबरचा करार जून २०२४च्या पुढे वाढवू इच्छित नाही." त्याच्या या वक्तव्याने क्लबला आश्चर्य वाटले. एमबाप्पेने २०२२मध्ये पीएसजीशी नवीन करार केला होता. त्यानंतर २०२५ पर्यंत संघासोबत राहण्याचे आश्वासन दिले. एमबाप्पे आणि पीएसजी यांच्यातील करारानुसार एमबाप्पे २०२४ पर्यंत क्लबचा खेळाडू राहील. जून २०२४ नंतर तो त्याचा करार एक वर्षासाठी वाढवू शकतो. आता एमबाप्पेने क्लबला एक वर्ष अगोदर पत्र लिहून जून २०२४ नंतर करार वाढवणार नसल्याचे सांगितले आहे.

एमबाप्पे नवीन क्लबच्या शोधात आहे. पॅरिस सेंट-जर्मेनबरोबरचा त्याचा करार पुढे संपत आहे, परंतु क्लबने त्याला नवीन संघ शोधण्याचे आदेश दिले आहेत. क्लबने त्याला विकण्याचा निर्णय घेतला आहे. तो आता ट्रान्सफर मार्केटमध्ये उपलब्ध आहे.




### पीएसजी एमबाप्पेला सोडू इच्छित नाही

वास्तविक, पीएसजी कोणत्याही परिस्थितीत एमबाप्पेला मुक्त खेळाडू म्हणून जाऊ देऊ इच्छित नाही. यासाठी त्यांनी एम्बाप्पे याचे नाव बाजारात आणले आहे. ते जगातील इतर क्लबकडून एमबाप्पेसाठी बोली ऐकण्यास उत्सुक आहेत. मात्र, पीएसजीला वाटते की त्यांची फसवणूक झाली आहे. क्लबचा विश्वासू सूत्रांकडून माहिती मिळाली आहे की, एमबाप्पेने आधीच रिअल माद्रिद या क्लबकडून विनामूल्य हस्तांतरणास सहमती दर्शविली आहे.

# इंग्लंडसाठी आनंदाची बातमी!

## » वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचे पुनरागमन

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ या स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून भारतात सुरू होणार आहे. यावेळी क्रिकेटच्या या सर्वात मोठ्या महाकुंभात एकूण १० संघ सहभागी होणार आहेत. २०२३ चा एकदिवसीय विश्वचषक देखील राऊंड रॉबिन स्वरूपात खेळवला जाईल. या स्पर्धेत इंग्लंडचा संघ पहिला सामना ५ ऑक्टोबरला न्यूझीलंडविरुद्ध खेळणार आहे.**

तत्पुर्वी, इंग्लंडसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. संघातील सर्वात महत्त्वाचा खेळाडू विश्वचषक स्पर्धेत भाग घेण्यासाठी तंदुरुस्त झाला आहे.

आयसीसी एकदिवसीय विश्वचषकापूर्वी इंग्लंड क्रिकेट संघाला मोठा दिलासा मिळाला आहे. कारण संघाचा स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर भारत दौऱ्यासाठी राष्ट्रीय संघात पुनरागमन करू शकतो. पाठीच्या फ्रॅक्चरमुळे आर्चरला सतत संघात राहण्यात अपयश आले आहे. आर्चरने या वर्षाच्या सुरुवातीला इंग्लंडच्या दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेशच्या मर्यादित षटकांच्या दौऱ्यांमध्ये आपले कौशल्य दाखवले, तेव्हा त्याने त्याच्या असामान्य प्रतिभेची झलक दाखवली. तथापि, आर्चरला आणखी एक धक्का बसला, जेव्हा त्याला दुखापतीमुळे आयपीएल २०२३ मधील मुंबई इंडियन्ससोबतची मोहीम संपवावी लागली. उजव्या कोपराला दुखापत आणि स्ट्रेस फ्रॅक्चरमुळे आर्चर इंग्लंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या ॲशेस मालिकेचा भागही होऊ शकला नाही. दरम्यान, त्याच्या देशांतर्गत संघ ससेक्सचे प्रमुख पॉल फारब्रेसने आशा व्यक्त केली आहे की, आर्चर भारतात आगामी विश्वचषक २०२३ साठी इंग्लंड संघात स्थान मिळविण्यासाठी सकारात्मक आहे.




### फॉर्म दीर्घकाळ टिकेल याची खात्री

बीबीसी रेडिओ 5 लाइव्हवर बोलताना पॉल फारब्रेस म्हणाले,"तो चांगली कामगिरी करत आहे. मला वाटते की तो विश्वचषकासाठी सज्ज आहे, ही चांगली बातमी आहे. मला वाटतं, इंग्लंडला पुढच्या ॲशेस मालिकेत जायचे असेल, तर त्यांना पुढील काही वर्षांत त्यातून सर्वोत्तम कसे मिळवायचे यावर काम करावे लागेल." आर्चरच्या कामाचा ताण प्रभावीपणे हाताळण्याचे आव्हान इंग्लंड व्यवस्थापन आणि कोचिंग स्टाफसमोर असेल. जेणेकरून त्याचा फिटनेस आणि फॉर्म दीर्घकाळ टिकेल याची खात्री होईल.

# धर्मशाळा क्रिकेट स्टेडियम सज्ज!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ या स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून सुरूवात होणार आहे. अहमदाबादमध्ये इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात पहिला सामना होणार आहे. विश्वचषकाचे ४९ सामने भारतातील १० शहरांमध्ये खेळवले जाणार आहेत. या यादीत धर्मशाळेचेही नाव आहे. हिमाचल प्रदेशातील धर्मशाळा येथे बनवलेले क्रिकेट स्टेडियम जगातील सर्वात सुंदर स्टेडियमपैकी एक आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने विश्वचषकापूर्वी नव्याने तयारी केली आहे. स्टेडियमचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

२०२३ च्या विश्वचषकापूर्वी बीसीसीआयने अनेक स्टेडियमचे नूतनीकरण केले आहे. बोर्डाने प्रत्येक स्टेडियमसाठी भरघोस बजेट दिले होते. या यादीत हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमचाही समावेश करण्यात आला आहे. धर्मशाळा येथील हे स्टेडियम तयार आहे. येथे नवीन गवताची लागवड करण्यात आली आहे. आऊटफिल्ड पूर्वीपेक्षा खूपच चांगले झाले आहे. ड्रेसिंग रूम आणि प्रेक्षकांसाठी व्यवस्था वाढवण्यात आली आहे. ड्रेसिंग रुममध्ये काही बदल करण्यात आले आहेत. विश्वचषक २०२३ चे पाच सामने धरमशाला येथे खेळवले जाणार आहेत. येथील पहिला सामना बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांच्यात ७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. यानंतर १० ऑक्टोबरला इंग्लंड आणि बांगलादेश यांच्यात सामना होणार आहे. १७ ऑक्टोबर रोजी दक्षिण आफ्रिका आणि नेदरलँड्स यांच्यात सामना होणार आहे.